लोकमत पु. पान १०.

# भाईंदरमध्ये दाम्पत्याची गळफास घेऊन आत्महत्या

## कर्जबाजारीपणामुळे संपवले जीवन?

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** भाईंदर पूर्वेच्या नवघर भागात पती व पत्नी यांनी मिळून गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

भाईंदर पूर्वेच्या नवघर गाव येथील गावदेवी चाळीत जांगीड कुटुंब राहते. १० एप्रिल रोजी नीतू पंकज जांगीड (वय ३०) व त्यांचे पती पंकज पुरुषोत्तम जांगीड (वय ३६) हे दोघे स्वयंपाकघरातल्या छताच्या पंख्यास ओढणीने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आले. पंकज यांचा लहान भाऊ संजूकुमार यांच्या माहितीवरून नवघर पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पती-पत्नीच्या आत्महत्येच्या घटनेने खळबळ उडाली असून आत्महत्येचे कारण मात्र अजून स्पष्ट झालेले नाही.



### पती-पत्नीत भांडणाचा आवाज ऐकला नाही

जांगीड दाम्पत्याचे सुमारे ९ ते १० वर्षांपूर्वी लग्न झाले होते. त्यांना ८ वर्षांची मुलगी आणि २ वर्षांचा मुलगा आहे. पंकज हे फर्निचर बनवून देण्याचे काम करत होते. भाऊ आदींशी ते फारसे काही अडचणीबद्दल सांगत नसले तरी त्यांच्यावर काही कर्ज झाले होते. पोलिसांनी आजूबाजूला चौकशी केली असता पती-पत्नीत भांडण झाल्याचा आवाज ऐकला नसल्याचे शेजाऱ्यांनी सांगितले. नीतू व पंकज यांचे मृतदेह १० एप्रिलच्या रात्री शवविच्छेदन केल्यानंतर अंत्यविधीसाठी त्यांच्या राजस्थान येथील मूळ गावी नेण्यात आले.

# वसईत एकाच दिवशी तिघांचा बुडून मृत्यू

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** पेल्हार आणि वसईत झालेल्या वेगवेगळ्या दोन घटनांत तिघांचा बुडून मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये दोन महिला आणि एका दीड वर्षाच्या चिमुकल्याचा समावेश आहे.

पहिल्या घटनेत भुईगाव येथे राहणाऱ्या नाताल डाबरे (८०) व त्यांची मुलगी मीना डाबरे (५६) गावातील भोळा तलावाजवळ गेल्या होत्या. बराच वेळ होऊन गेला तरी त्या परत आल्या नाहीत. त्यामुळे नाताल डाबरे यांचा मुलगा केतान याने शोध घेतला असता, तलावाजवळ दोघींच्या चपला आढळल्या. अग्निशमन दलाच्या जवानांनी तलावात शोध घेऊन दोघींचे मृतदेह बाहेर काढले. याप्रकरणी वसई पोलिसांनी बुधवारी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

दुसऱ्या घटनेत पेल्हारजवळील जाबरपाडा येथील दीड वर्षांचा रुद्र पिलाना हा चिमुकला पाण्याच्या टबमध्ये बुडून मरण पावला आहे.



### खेळताना पडला टबमध्ये

रुद्र हा खेळता खेळता पाण्याच्या टबमध्ये गेला होता. बऱ्याच वेळाने त्याच्या कुटुंबीयांना याबाबत समजले. बेशुद्धावस्थेत असलेल्या रुद्रला सुरुवातीला पेल्हारच्या गॅलेक्सी या खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

अधिक तपासासाठी त्याला पालिकेच्या तुळींज येथील रुग्णालयात हलविण्यात आले होते, मात्र तोपर्यंत त्याचा मृत्यू झाला होता. याप्रकरणी अधिक तपास करत असून बुधवारी मृत्यूची नोंद केल्याची माहिती पेल्हारचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक जितेंद्र वनकोटी यांनी दिली.

CamScanner

लोकमत पू. पान क्र. 1

# 'एसी' चोरणाऱ्या तिघांना खावी लागली जेलची हवा

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : मीरा रोडच्या पूनम सागर कॉम्प्लेक्सजवळ कासाडेला हॉटेलमागे असलेल्या एका हॉलच्या गेटच्या बाहेरील बाजूस लावलेला एसी चोरून नेल्याची घटना घडली आहे.

याप्रकरणी जगदीश शर्मा यांच्या फिर्यादीवरून नयानगर पोलिसांनी ९ एप्रिल रोजी गुन्हा दाखल करून तिघांना अटक केली आहे.

## पोलिसांकडून तपास

याप्रकरणी पोलिसांनी रिक्षाचालक वसीम खलील अंसारी (वय ३५, रा. मरियन अपार्टमेंट, गोविंदनगर, मीरा रोड); अलामीन इमान अली मुल्ला (वय २०, रा. कनकिया समोरील झोपडपट्टी) व आवेश अहमद खान (वय २६, रा. नयानगर) या तिघांवर गुन्हा दाखल केला आहे. व.पो.नि. विलास सुपे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास करत पोलिसांनी तिन्ही आरोपीना अटक केली आहे.

# आत्महत्येस प्रवृत्त; गुन्हा दाखल




नालासोपारा : तुंगारफाटा येथील आझादनगर येथे राहणाऱ्या रागिणी यादव यांनी १ एप्रिलला सकाळी आत्महत्या केली होती. आरोपी अजय शर्मा याने त्यांना वेळोवेळी शिवीगाळ, दमदाटी करत मारहाण केली होती. तू मेली तरी मला फरक पडत नाही. तू मेली की दुसरे लग्न करेन, असे बोलून त्यांना शारीरिक व मानसिक त्रास देऊन आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले. पेल्हार पोलिसांनी मंगळवारी गुन्हा दाखल केला आहे. पेल्हार पोलिस अधिक तपास करीत आहेत.

# स्कीममध्ये पैसे गुंतवण्यास सांगून केली फसवणूक

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : वांगणी येथील वरदविनायक सोसायटीत राहणाऱ्या हेमांगी नाखवा (४२) यांची १२ ऑगस्ट २०१९ ते आजपर्यंत स्कीममध्ये पैसे गुंतवण्यास सांगून लाखोंची फसवणूक केली आहे.

आरोपी तुकाराम चाळके याने त्यांना 'हमारा साथ आपका विश्वास' या स्कीममध्ये पैसे गुंतवण्यास सांगून एक लाख रुपये गुंतवल्यास त्याच्या बदल्यात दरमहा ३४ हजार २०० रुपये परतावा देण्याचे सांगितले होते. त्याने त्यांच्याकडून ३ लाख रुपये घेऊन फसवणूक केली आहे. तुळींज पोलिसांनी मंगळवारी गुन्हा दाखल केला आहे.

# महिलेचा विनयभंग



मीरा रोड : भाईंदर पूर्वेच्या नवघर पोलिस ठाणे हद्दीत राहणाऱ्या ३२ वर्षीय महिलेस गोडदेव गावातील मंजुळा निवास भागात राहणाऱ्या यश किशोर पाटील (वय २५) या तरुणाने महिलेच्या कानाखाली मारत शिवीगाळ करत गच्चीवर नेऊन रेमटवतो, असे म्हटले. महिलेच्या फिर्यादीवरून नवघर पोलिसांनी यशविरुद्ध विनयभंगाचा गुन्हा दाखल केला आहे. नवघर पोलिस ठाण्याचे हवालदार लक्ष्मण शिंदे तपास करत आहेत.

CamScanner

लोकमत पु. पान ६०।

## एटीएम बदलले; ३२ हजार काढले



**मीरा रोड :** मीरा रोडच्या नयानगरमधील लोधा मार्ग, चंद्रेश छाया इमारतीत राहणाऱ्या फरहद राशीद शेख (वय ४८) या गृहिणी सीता स्मृती इमारत येथील एटीएममधून पैसे काढण्यासाठी गेल्या होत्या. त्यावेळी एका अनोळखी इसमाने मदतीच्या बहाण्याने पिन पाहून नंतर पैसे जास्त निघाले ते एटीएममध्ये पुन्हा टाकतो, असे सांगत हातचलाखीने शेख यांचे एटीएम कार्ड बदलून घेतले. नंतर त्या कार्डद्वारे ३२ हजार रुपये काढून शेख यांची फसवणूक केली. या प्रकरणी नयानगर पोलिसांनी ९ एप्रिलच्या रात्री गुन्हा दाखल केला आहे.

## पोलिसांनी जुगारी पकडले

**नालासोपारा :** वाघराळपाडा येथील मुर्गी फार्मच्या जवळील शिवदर्शन चाळीच्या आडोशाला मंगळवारी दुपारी जुगार खेळणाऱ्या ६ जुगाऱ्यांना गुन्हे शाखेच्या युनिट-२ च्या पोलिसांनी पकडले आहे. इलियास खान (२२), शैलेश त्रिपाठी (४१), रोहित कुशवाह (२१), तारीफ खान (२५), सोहेल खान (२५) आणि सलमान खान (३८) या सहा जुगाऱ्यांना ताब्यात घेऊन ४ हजार ५१० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. पोलिस शिपाई राजकुमार गायकवाड यांनी वालीव पोलिस ठाण्यात तक्रार देऊन गुन्हा दाखल केला आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

पुढारी . पु. पा. २.

# शेडअभावी प्रवाशांची रणरणत्या उन्हात परवड

**नालासोपारा : पुढारी वृत्तसेवा**

वसई विरार शहर पालिकेच्या मुख्य कार्यालयाच्या आवारात पालिकेच्या वाहतूक परिवहन विभागाचे बस स्थानक आहे या स्थानकातून विरार शहराच्या अनेक भागात अनेक गाड्या जा-ये करत असतात मात्र ह्या बस पकडण्यासाठी प्रवाश्यांना भर रखरखत्या उन्हात रांगेत उभे राहून बस येण्याची वाट पहावी लागते यामुळे प्रवाश्यांना बस स्थानकाच्या ठिकाणी छप्पर लाऊन द्यावे अशी मागणी प्रवाशांनी केली आहे.

विरार शहरात वसई विरार शहर महानगरपालिकेच्या परिवहन विभागाची परिवहन सेवा सुरू आहे ही सेवा वीर सावरकर मार्ग, मनवेलपाडा रोड, कारगिल नगर, जीवदानी रोड, विरार फाटा, फुलपाडा रोड, अशा ठिकाणी चालू आहे. या परिवहन सेवेचे बस स्थानक महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयाच्या आवारात आहे या ठिकाणाहून हजारो नागरिक दिवसाला प्रवास करत असतात मात्र पालिकेच्या बाजूला असलेल्या बस स्थानकात प्रवाश्यांना उभे राहण्याची सोय नसल्याने प्रवाश्यांनी पालिकेच्या परिवहन विभागावर नाराजी व्यक्त केली आहे. अनेक दिवसापासून शहरात उष्णतेच्या झळ तीव्र भासू लागल्या आहेत त्यातच बस स्थानकात बस पकडण्याच्या ठिकाणी छप्पर नसल्यामुळें प्रवाश्यांना भर उन्हात उभे राहून पालिकेच्या बसेसची वाट बघावी लागते यामध्ये ज्येष्ठ नागरिक, शाळेतील शाळकरी, चाकर मनी, यांचा समावेश आहे यामुळे त्याठिकाणी प्रवाश्यांना चक्कर येऊन पडणे असे प्रकार होत असतात होत असून निदान ज्येष्ठ नागरिकांना ,महिलावर्गाला बसण्याची व्यवस्था करावी तसेच छप्पर देता का छप्पर अशी मागणी प्रवाशांनी केली आहे.



बस पकडण्यासाठी प्रवाशांची धडपड

लोकमत ५.४.२४.

## कौटुंबिक वादातून जावयाची सासऱ्यास मारहाण

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरारोड पूर्वेच्या नूपुर नगर भागात दिलीप सावंत हे इस्टेट एजंट राहतात. त्यांच्या पुतणीचे निखिल विवेकानंद राणे यांच्याशी लग्न झाले असून, गेल्या सात महिन्यांपासून राणे दाम्पत्य हे कौटुंबिक वादामुळे वेगळे राहते. सावंत यांची पुतणी मुलीला रुग्णालयात नेण्यासाठी घरातून बाहेर पडली असता सावंत यांना निखिल राणे यांनी तू माझ्या व मुलीमध्ये पडायचे नाही असे बोलून शिवीगाळ करत दमदाटी केली. तसेच ठोशाबुक्क्यांनी मारहाण केली.

या मारहाणीत सावंत यांचे नाक फ्रॅक्चर झाले तसेच डोळ्याच्या बाजूला दुखापत झाली. सावंत यांच्या फिर्यादीवरून नया नगर पोलिसांनी निखिल राणेविरुद्ध १० एप्रिल रोजी गुन्हा दाखल केला आहे.

पोलिस उपनिरीक्षक समाधान कैंगार हे तपास करत आहेत. तर निखिल राणेच्या फिर्यादीवरून दिलीप सावंत यांच्यावर अदखलपात्र गुन्हा पोलिसांनी दाखल केला आहे. या प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत.

# काशीगावात गाईची कत्तल करणाऱ्या तिघांना अटक

### आरोपींना १४ एप्रिलपर्यंत पोलिस कोठडी

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** काशीगाव भागातील डोंगराजवळ एका गायीची कत्तल केल्याप्रकरणी स्थानिक रहिवाशांच्या तक्रारीनंतर काशीगाव पोलिसांनी तिघांना अटक केली असून, त्यांना १४ एप्रिलपर्यंत पोलिस कोठडी ठाणे न्यायालयाने दिली आहे.

येथील मीनाक्षीनगर भागातील डोंगराजवळ त्याच भागात राहणारा नईम सैफ कुरेशी (३३) याने मध्यरात्रीच्या सुमारास एका टेम्पोतून गाय आणल्याचे स्थानिक रहिवाशांना दिसून आले. दोन रहिवाशांनी त्याच्यावर पाळत ठेवली असता बुधवारी पहाटे तो गाय कापत असल्याचे समजतात रहिवाशांनी ११२ क्रमांकावर कॉल करून तक्रार केली. तक्रार मिळाल्यानंतर काशीगाव पोलिस ठाण्यातील पोलिस उपनिरीक्षक अभिजित लांडे व राणा परदेशीसह पोलिस कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले; मात्र त्या आधीच आरोपींनी गायीची कत्तल केली असल्याचे आढळून आले.



- **पोलिसांनी याप्रकरणी नईमची कसून चौकशी तसेच तपास करत पळून गेलेल्या मौसीन महेबूब पाशा (२४, रा. संघवी एम्पायर बिल्डिंग, हैदरी चौक, नयानगर, मीरा रोड) व छंगूर हिरालाल नूर (३२, रा. मीनाक्षीनगर, काशीगाव) या दोघांनादेखील अटक करण्यात आली.**
- याप्रकरणी काशीगाव पोलिस ठाण्यात भारतीय दंड संहिता, महाराष्ट्र पशू संरक्षण अधिनियम आणि प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वरिष्ठ पोलिस निरीक्षक राहुलकुमार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक राणा परदेशी हे पुढील तपास करत आहेत.

## गैरसमजातून सुरक्षारक्षकास मारहाण

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा रोडच्या नयानगर, पूजानगर भागातील अलसबा इमारतीत मोहम्मद अस्लम गुलाम हुसेन (४५) हे सुरक्षारक्षकाचे काम करतात व तेथील खोलीत राहतात. हुसेन हे कामावर असताना पूजानगर, हाजी युसूफ मंजिलमध्ये राहणारा शाहनवाज खान याच्या मुलाला मारहाण केली असल्याबाबत गैरसमज झाला. त्याचा राग मनामध्ये धरून हुसेन यांना शिवीगाळ केली व मारण्याची धमकी दिली. तसेच, त्यांच्या नाकावर व डोक्यात बुक्क्यांनी मारहाण केली. याप्रकरणी १० एप्रिल रोजी हुसेन यांच्या फिर्यादीवरून नयानगर पोलिसांनी शहानवाज खानविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## गळफास घेऊन महिलेची आत्महत्या

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** शिर्डी नगरच्या साई सिद्धी अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या सुप्रिया पांचाळ (६५) यांनी आत्महत्या केली आहे. त्यांनी बुधवारी सकाळी राहत्या रूमच्या बेडरूममधील पंख्याला नायलॉन दोरीच्या साहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. आचोळे पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

पुढारी ५.५.१.

# गुजरातवरून येणाऱ्या बसमधून २० गोणी मावा जप्त

**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

गुजरातवरून दररोज प्रवासी लक्झरी बस मोठ्या प्रमाणात येतात. या बसने प्रवास करणाऱ्यांची संख्या भरपूर आहे. या प्रवासी लक्झरी बसमधून २० गोणी मावा आणला जात होता. काशीगाव पोलिसांना याची माहिती मिळताच पोलिसांनी २० गोणी मावा जप्त केला आहे.

गुजरातमधून मुंबईला दररोज प्रवासी लक्झरी बस मोठ्या प्रमाणात येतात. या बसमधून या बसमधून अनेक वेळा गुटख्याची देखील वाहतूक केली जात असल्याचे सांगितले जाते. गुजरातकडून येणाऱ्या दोन लक्झरी बस मधून भेसळयुक्त मावा आणला जात असल्याची माहिती काशीगाव पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेतील सहायक पोलीस निरीक्षक माणिक पाटील यांना मिळाली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुलकुमार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने मंगळवारी सकाळी महामार्गावरील काशीमीरा उड्डाण पूल सुरु होण्याआधी लक्ष्मीबाग येथे सापळा रचून दोन बस मधून आणला जाणारा २० किलो मावा जप्त केला. याची माहिती अन्न व औषध प्रशासनाला देण्यात आल्या नंतर अन्न प्रशासनाच्या सहायक आयुक्त धनश्री ढाणे यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा अधिकारी वसावे यांनी माव्याचे नमुने तपासासाठी घेतले. उर्वरित मावा हा नष्ट करण्यात आला आहे. या कारवाईनंतर बस मधून मोठ्या प्रमाणात मावा ऐन सणासुदीच्या दिवसात बाहेरून आणला जात असल्याचे उघड झाले आहे.

म. टा. ५.५.१.

# महामार्गालगत भराव टाकणाऱ्यांवर नजर

**म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर**

## पालिकेकडून सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचा विचार



मुंबई-अहमदाबाद महामार्गावर मिरा-भाईंदरच्या हद्दीत महामार्गालगत बेकायदा भराव टाकण्याचे प्रकार वारंवार सुरू आहेत. यामुळे वाहन अपघात किंवा पावसाळ्यात पाणी साचण्याची शक्यता असून, भराव करणाऱ्या वाहनांवर नजर ठेवण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याचा विचार महापालिकेकडून करण्यात येत आहे. त्याकरीता सर्वेक्षण करण्याचे आदेश पालिका आयुक्तांकडून नुकतेच देण्यात आले आहेत.

मिरा-भाईंदरमधून सुमारे सहा किमीहून अधिक अंतराचा मुंबई-अहमदाबाद महामार्ग जातो. या मार्गावर प्रामुख्याने दिल्ली दरबार हॉटेल ते वरसावे पुलापर्यंत रस्त्यालगत मोठ्या प्रमाणात इमारत पाडकामाचे डेब्रिज, मातीचा भराव टाकण्याचे प्रकार नेहमीच सुरू असतात. मुंबई व मिरा-भाईंदरच्या इतर भागांतून वाहनांमधून भराव घेऊन येऊन रात्रीच्या वेळी तो येथे टाकला जातो. त्यामुळे भराव टाकणाऱ्यांवर कारवाई करणे अशक्य होते.

मागच्या महिन्यात मार्गालगतचे भरावाचे ढीग दिवसागणिक वाढत चालल्याचे दिसून येत आहे. परिणामी रस्त्यालगत मोकळी जागा नसल्यामुळे वळणाच्या ठिकाणी अपघात होण्याची भीती अनेकांकडून वर्तविली जात आहे. आगामी पावसाळ्यात पाण्याच्या प्रवाहात भरावामुळे अडथळा निर्माण होऊन मार्गावर पाणी साचण्याची शक्यता नाकारता येत नाही. वसई-विरारच्या पट्ट्यात भरावामुळे पावसाच्या पाण्याचा निचरा न झाल्याने गेल्या वर्षी रस्ता पाण्याखाली गेला होता. या पार्श्वभूमीवर आता महामामार्गालगत होणारा माती भराव रोखण्यासाठी मनपाकडून खबरदारी घेतली जात आहे.

नुकत्याच पार पडलेल्या बैठकीत मनपा आयुक्त संजय काटकर यांनी, महामार्गालगत भराव करणाऱ्या वाहनांवर नजर ठेवण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याच्या दृष्टीने सर्वेक्षण करून त्याचा अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

# गोवंश कत्तल : दोघांवर गुन्हा

**म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर**

मिरारोडच्या काशिगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीतील जंगलात गाईची कत्तल केल्याप्रकरणी दोन जणांवर नुकताच गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नईम सैफ कुरेशी असे एका अटक आरोपीचे नाव असून दुसऱ्या अज्ञात आरोपीचा शोध सुरू आहे.

काशिमिरा येथील मीनाक्षी व गगनगिरी नगर भागातील जंगलात गोवंशातील जनावरांची कत्तल केली जात असल्याचा फोन काशिगाव पोलिसांना मंगळवारी मध्यरात्री आला होता. घटनास्थळी पोलिस गेले असता, त्यांना कत्तल केलेल्या गाईचे मोठ्या प्रमाणावर मांस, धारदार शस्त्र व दोरी आदी साहित्य मिळून आले. येथे उपस्थित असलेल्या तिघांनी पोलिसांना बघताच पळ काढला. यातील नईमला पकडण्यात यश आले आहे. याप्रकरणी काशिगाव पोलिसांनी नाईमसह इतर एका अनोखी व्यक्तींवर गुन्हा दाखल केला आहे. तर दोन संशयित आरोपींची चौकशी सुरू आहे.

CamScanner

अखंड महाराष्ट्राचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

# हेरॉईन विक्रीस आलेले दोघे अटकेत

मिरारोड : भाईंदर पश्चिमेच्या भोला नगर परिसरात हेरॉईन विक्री करण्यासाठी आलेल्या दोघांना भाईंदर पोलिसांनी अटक केली आहे. आरोपीकडून हेरॉईन पावडर व अन्य मुद्देमाल असा ५ लाख ६१ हजाराचा मुद्देमाल जप्त केला आहे.

भाईंदर पोलीस ठाणे हद्दीत भोला नगर जवळ, जे.पी. इन्फ्रा बांधकाम साईटच्या बाजूला आरोपी गौतम गुप्ता (३०) रिक्षाचालक व सचिन उर्फ बटला गुप्ता (२३) दोघेही राहणार भोला नगर भाईंदर प. येथे हेरॉईन विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार भाईंदर वरिष्ठ पोलीस निरीक्षक सूर्यकांत नाईकवाडी यांच्या आदेशानुसार पोलीस निरीक्षक गुन्हे विवेक सोनावणे व त्यांच्या पथकाने सापळा लावला. त्यावेळी आरोग्यास हानिकारक अमली पदार्थ स्वत:जवळ बाळगून त्याची विक्री करण्यासाठी आरोपी आले असल्याचे आढळून आले म्हणून पोलीस हवालदार राजेश श्रीवास्तव यांच्या फिर्यादीवरून त्यांच्या विरोधात भाईंदर पोलीस ठाण्यात गुंगीकारक औषधी द्रव्ये व मनोव्यापारांवर परिणाम करणारे पदार्थ अधिनियमाप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपीकडून १८ ग्राम वजनाचा ४ लाख ५० हजार किमतीचा हेरॉईन अमली पदार्थ, रोख रक्कम व एक ऑटोरिक्षा असा ५ लाख ६१ हजारांचा मुद्देमाल जप्त करत दोन्ही आरोपींना अटक केली.गुन्ह्याचा अधिक तपास भाईंदर पोलीस उपनिरीक्षक यशवंत साळुंखे हे करत आहेत.

ठाणे आवृत्ती
१३ एप्रिल २०२४ पृष्ठ क्रमांक ०७
द्वारा समर्थित: erelego.com

CS CamScanner

9 राज्य, 18 संस्करण मुंबई, पुणे, नई दिल्ली, इंदौर, भोपाल, सागर, उज्जैन, जबलपुर, ग्वालियर, रतलाम, रायपुर, बिलासपुर, दुर्ग, जयपुर,लखनऊ, जालंधर, रांची, कोलकाता से एक साथ प्रकाशित | मूल्य ₹ 5.00

सुविचार
कभी भी जीवन के फैसले जल्दबाजी में नहीं करना चाहिए।

दैनिक
# दबंग दुनिया
मुंबई, शनिवार, 13 अप्रैल 2024
निष्पक्ष नजर, निष्पक्ष खबर
देश का सबसे चर्चित संपूर्ण हिन्दी अखबार

अंदर पढ़ें


पेज 08

# नालासोपारा में फिर बरामद हुआ एम.डी.ड्रग्स व कोकीन, एक नाईजीरियन गिरफ्तार

**दबंग रिपोर्टर » वसई**

अवैध मादक पदार्थों के खिलाफ तुलिंज पुलिस द्वारा लगातार कार्रवाई की जा रही है। इसी कड़ी में तुलिंज पुलिस ने फिर नालासोपारा पूर्व के प्रगति नगर इलाके से एक 44 वर्षीय नाईजीरियन के पास से लाखों रुपये के कोकीन व एम.डी.ड्रग्स की एक बड़ी खेप बरामद की है। जिसकी कुल कीमत 57 लाख रुपये से अधिक बताई जा रही है। उपरोक्त कार्रवाई तुलिंज पुलिस ने 11 अप्रैल को रात्रि लगभग 9 बजे के आसपास की है। यह कार्रवाई डीसीपी (परिमंडल 2) पौर्णिमा चौगुले श्रींग्री व एसीपी उमेश माने पाटील के मार्गदर्शन में तुलिंज थाने के सीनियर पुलिस निरीक्षक शैलेन्द्र नगरकर के मार्गदर्शन में तुलिंज थाने के स्टॉफ ने की है।

मिली जानकारी के अनुसार, तुलिंज पुलिस ने गुप्त सूचना के आधार पर नालासोपारा पूर्व के हाईटेंशन रोड,प्रगति नगर क्षेत्र में रेड की। इस दौरान तुलिंज पुलिस ने एक 44 वर्षीय नाईजीरियन शख्स को हिरासत में लिया। पुलिस ने कहा कि,छानबीन के दरम्यान नाईजीरियन शख्स के पास से 133 ग्राम वजन कोकीन (कीमत - 13,30,000 रुपये ) और 442 ग्राम वजन एम.डी. (मेफेड्रॉन) ड्रग्स (कीमत -44,20,000 रुपये ) बरामद किया गया है। पुलिस ने कहा कि,उक्त नाईजीरियन के पास से कुल 557 ग्राम वजन (कोकीन- एम.डी. ड्रग्स ) जिसकी कुल कीमत- 57,50,000 रुपये का अवैध मादक पदार्थ जप्त किया गया है।पुलिस ने कहा कि,अवैध कोकीन व एम.डी उसके पास से बिक्री के लिए पाई गई है। फिलहाल, तुलिंज थाने में कार्यरत पुलिस कर्मचारी (पांडुरंग विठ्ठल सगले) की शिकायत पर तुलिंज पुलिस स्टेशन ने नाईजीरियन (इझे फ्रान्सिस आना) के ऊपर एनडीपीएस एक्ट के तहत अपराध दर्ज कर लिया गया है और आगे की तहकीकात में जुट गयी है।बातदे कि, तुलिंज थाने के सीनियर पुलिस निरीक्षक शैलेन्द्र नगरकर के नेतृत्व में तुलिंज पुलिस स्टॉफ द्वारा पिछले कई महीनों से नालासोपारा पूर्व के प्रगति नगर क्षेत्र नाईजीरियन के विरुद्ध अभियान छेड़ रखी है। यही कारण है कि,तुलिंज पुलिस के हाथ कई नाईजीरियन अवैध मादक पदार्थ के साथ पकड़े जा चुके है,जिसकी कीमत लाखों रुपये है।

CamScanner

1997 से
KAT खबरें आज तक
not a publication of the living media india group
वर्ष : 27 अंक-294 मुंबई, शनिवार 13 अप्रैल 2024 पृष्ठ-12 मूल्य : 2.00

# अवैध मादक पदार्थ पर शिकंजा ; 57,50,000 रुपये का कोकीन व एम.डी.ड्रग्स बरामद , एक नाईजीरियन गिरफ्तार

**वसई:** अवैध मादक पदार्थों के खिलाफ तुलिंज पुलिस द्वारा लगातार कार्रवाई की जा रही है। इसी कड़ी में तुलिंज पुलिस ने फिर नालासोपारा पूर्व के प्रगति नगर इलाके से एक 44 वर्षीय नाईजीरियन के पास से लाखों रुपये के कोकीन व एम.डी.ड्रग्स की एक बड़ी खेप बरामद की है। जिसकी कुल कीमत 57 लाख रुपये से अधिक बताई जा रही है।उपरोक्त कार्रवाई तुलिंज पुलिस ने 11 अप्रैल को रात्रि लगभग 9 बजे के आसपास की है। यह कार्रवाई डीसीपी (परिमंडल 2) पौर्णिमा चौगुले श्रींग्री व एसीपी उमेश माने पाटील के मार्गदर्शन में तुलिंज थाने के सीनियर पुलिस निरीक्षक शैलेन्द्र नगरकर के मार्गदर्शन में तुलिंज थाने के स्टॉफ ने की है।

मिली जानकारी के अनुसार, तुलिंज पुलिस ने गुप्त सूचना के आधार पर नालासोपारा पूर्व के हाईटेंशन रोड,प्रगति नगर क्षेत्र में रेड की,इस दौरान तुलिंज पुलिस ने एक 44 वर्षीय नाईजीरियन शख्स को हिरासत में लिया। पुलिस ने कहा कि,छानबीन के दरम्यान नाईजीरियन शख्स के पास से 133 ग्राम वजन कोकीन (कीमत - 13,30,000 रुपये ) और 442 ग्राम




वजन एम.डी. (मेफेड्रॉन) ड्रग्स (कीमत -44,20,000 रुपये ) बरामद किया गया है। पुलिस ने कहा कि,उक्त नाईजीरियन के पास से कुल 557 ग्राम वजन (कोकीन-एम.डी. ड्रग्स ) जिसकी कुल कीमत- 57,50,000 रुपये का अवैध मादक पदार्थ जप्त किया गया है।

पुलिस ने कहा कि,अवैध कोकीन व एम.डी उसके पास से बिक्री के लिए पाई गई है। फिलहाल,तुलिंज थाने में कार्यरत पुलिस कर्मचारी (पांडुरंग विठ्ठल सगले) की शिकायत पर तुलिंज पुलिस स्टेशन ने नाईजीरियन (इझे फ्रान्सिस आना) के ऊपर एनडीपीएस एक्ट के तहत अपराध दर्ज कर लिया गया है और आगे की तहकीकात में जुट गयी है।बातदे कि, तुलिंज थाने के सीनियर पुलिस निरीक्षक शैलेन्द्र नगरकर के नेतृत्व में तुलिंज पुलिस स्टॉफ द्वारा पिछले कई महीनों से नालासोपारा पूर्व के प्रगति नगर क्षेत्र नाईजीरियन के विरुद्ध अभियान छेड़ रखी है। यही कारण है कि,तुलिंज पुलिस के हाथ कई नाईजीरियन अवैध मादक पदार्थ के साथ पकड़े जा चुके है,जिसकी कीमत लाखों रुपये है।

CS CamScanner

लोकमत

न्यूज Inbox

## इतर साहित्यासह ५७ लाखांचा माल जप्त

# लाखोंच्या अमली पदार्थासह नायजेरियनला अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** अंमली पदार्थ बाळगणाऱ्या एका नायजेरियन आरोपीला तुळींजच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांनी आरोपीच्या घरातून ४४ लाख २० हजारांचे अमली पदार्थ व इतर साहित्य असा मिळून ५७ लाख ५० हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

प्रगतीनगरच्या जगन्नाथ अपार्टमेंट या इमारतीमध्ये एक नायजेरियन अमली पदार्थांची विक्री करत आहे, अशी माहिती तुळींजचे पोलिस अंमलदार पांडुरंग सगळे यांना गुरुवारी मिळाली. याबाबत अंमलदार सगळे यांनी तुळींज विभागाचे सहायक पोलिस आयुक्त यांना सांगितले. त्यांच्या आदेशाने व तुळींजचे पोलिस अधिकारी व अंमलदार यांच्यासह सापळा रचला. तेथून नायजेरियन आरोपी इझे आना (४४) याला ताब्यात घेतले. घराची झडती घेतल्यावर १३ लाख ३० हजाराचे कोकेन आणि ४४ लाख २० हजाराचे मेफेड्रोन हा अमली पदार्थ आढळला. तसेच मोबाइल, रोख, इलेक्ट्रिक वजन-काटा, पिशव्या असा ५७ लाख ६२ हजारांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे.



## यांनी केली कामगिरी

ही अटकेची कामगिरी पोलिस उपायुक्त पौर्णिमा चौगुले श्रींगी, सहायक पोलिस आयुक्त उमेश माने-पाटील, तुळींजचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक शैलेंद्र नगरकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सहायक फौजदार बाळू बांदल, पोलिस हवालदार आनंद मोरे, उमेश वरठा, अशपाक जमादार, पांडुरंग केंद्रे, इस्माईल छपरीबन, राहुल कदम, सगळे, राजगे, बागूल, अमोल बर्डे यांनी केली आहे.

- तुळींज पोलिसांनी एनडीपीएस ॲक्टनुसार गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे. जप्त मुद्देमाल कोठून खरेदी केला याबाबत आरोपीकडे चौकशी करत आहे.



CS CamScanner